आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५

ठळक बातम्या

1. संविधान सभेत झालेल्या चर्चा, हा गौरवशाली वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं पंतप्रधानांच 'मन की बात' मधून आवाहन.

2. जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत भाग घेण्यासाठी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री दावोसला रवाना.

3. विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना प्रती एकरी उत्पादनामध्ये वाढ, रोगमुक्त रोपे त्याचप्रमाणे गुणवत्ता आणि चाचणी यावर संशोधन केंद्रांनी उपाय सुचवले पाहिजे- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन.

4. अभिनेता सैफ अली खान हल्ल्या प्रकरणी मुख्य संशयिताला ठाण्यातून अटक.

मन की बात

संविधान सभेत झालेल्या चर्चा, सदस्यांनी मांडलेले विचार, हा आपला सर्वात मोठा वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा, असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' कार्यक्रमातून केलं.भारताच्या प्रजासत्ताकाचा ७५वा वर्धापन दिन, तसंच भारतीय संविधान लागू झाल्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमीत्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.राजेंद्र प्रसाद, डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी संविधान सभेत मांडलेल्या विचारांचं ध्वनिमुद्रण पंतप्रधानांनी श्रोत्यांना ऐकवलं.

*जब संविधान सभा ने अपना काम शुरू किया, तो बाबासाहब आंबेडकर ने परस्पर सहयोग को लेकर एक बहुत महत्वपूर्ण बात कही थी। but my fear which I must express clearly is this, our difficulty as I said is not about the ultimate future. Our difficulty is how to make the heterogeneous mass that we have today, take a decision in common and march in a cooperative way on that road which is bound to lead us to unity. ये audio डॉ.राजेंद्र प्रसाद जी का है - हमारी जिंदगी और संस्कृति में कुछ ऐसा है जिसने हमें समय के थपेड़ों के बावजूद जिंदा रहने की*

*शक्ति दी है। अगर हम अपने आदर्शों को सामने रखे रहेंगे तो हम संसार की बड़ी सेवा कर पाएंगे।"*

येत्या २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन असल्याचं सांगून ते म्हणाले की, संविधानाने निवडणूक आयोगाला खूप महत्त्वाचं स्थान दिलं आहे, आणि गेल्या दशकभरात देशाची लोकशाही अधिक मजबूत आणि समृद्ध झाली आहे. निवडणूक आयोगानं तंत्रज्ञानाचा वापर करत, लोकशाहीला बळ दिलं आहे, असं म्हणत नागरिकांनी वेळोवेळी आपला मताधिकार बजावत लोकशाही प्रक्रियेचा भाग व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं. भारतानं अंतराळ क्षेत्रात केलेल्या ऐतिहासिक कामगिरीविषयी त्यांनी श्रोत्यांना महिती दिली. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं अंतराळात दोन उपग्रहांना परस्परांशी जोडण्याचा प्रयोग नुकताच यशस्वी करून दाखवल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भारतीय अंतराळ तंत्रज्ञान स्टार्ट-अप कंपनीनं देशातला पहिला खाजगी उपग्रह यशस्वीरित्या प्रक्षेपित केल्याची माहिती त्यांनी दिली. काही दिवसांपूर्वीच स्टार्टअप इंडिया योजनेला ९ वर्ष पूर्ण झाल्याचं स्मरण पंतप्रधानांनी करून दिलं. यावेळी आंकाक्षीत वाशीम जिल्ह्यात स्टार्ट अप ईंडीयाच्या माध्यमातून झालेल्या लघु उद्योगातील भरभराटीचा नरेंद्र मोदी यांनी विशेष नामोल्लेख केला आहे.

*कुछ दिन पहले ही StartUp इंडिया के 9 साल पूरे हुए हैं। हमारे देश में जितने StartUps 9 साल में बने हैं उनमें से आधे से ज्यादा Tier 2 और Tier 3 शहरों से हैं, StartUp Culture बड़े शहरों तक ही सीमित नहीं है। और आपको यह जानकर हैरानी होगी कि छोटे शहरों के StartUps में आधे से ज्यादा का नेतृत्व हमारी बेटियां कर रही हैं। जब यह सुनने को मिलता है कि अंबाला, हिसार, कांगड़ा, चेंगलपट्टु, बिलासपुर, ग्वालियर और वाशिम जैसे शहर StartUps के Center बन रहे हैं, तो 'मन' आनंद से भर जाता है।*

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरू असलेला महाकुंभमेळा म्हणजे एकतेचं दर्शन घडवणारा महाकुंभ आहे, असं ते म्हणाले. यंदाच्या कुंभमेळयात युवा वर्गाचा मोठा सहभाग असल्याचा उल्लेख करुन त्यांनी समाधान व्यक्त केलं. येत्या २३ जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी आपण पराक्रम दिवस साजरा करणार असल्याची आठवण त्यांनी श्रोत्यांना करुन दिली. सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याला उजाळा देतानाच बोस यांच्या घराला भेट दिल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांना ऐकवला.

## दाओस दौरा

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, स्वित्झर्लंडमधल्या दाओस इथं उद्यापासून सुरु होणाऱ्या, जागतिक आर्थिक मंच २०२५ मध्ये सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात ते देशाच्या विकास आराखड्याची माहिती देतील. पाच दिवसांच्या जागतिक आर्थिक मंच कार्यक्रमात, समावेशक विकास तसंच सामाजिक, भौतिक आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण या मुद्द्यांवर व्यापक चर्चा केली जाईल, असंही ते म्हणाले. भारताचं आर्थिक धोरण, डिजिटल संरचना तसंच समाजाच्या सर्व घटकांना सक्षम बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर याबाबत जाणून घेण्यासाठी जग उत्सुक असल्याचं त्यांनी सांगितलं. या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल रात्री रवाना झाले आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत त्यांच्यासोबत आहेत. डाटा केंद्रं, स्वयंचलित वाहनं, सेमीकंडक्टर, विद्युत वाहनं, इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधं आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात मोठ्या संख्येनं सामंजस्य करार या दौऱ्यात केले जाणार आहेत.

## मोहता विज्ञान कॉलेज

विदर्भात जास्तीत जास्त रोजगार कसा निर्माण करता येईल, याचा विचार करण्याची गरज आहे. आपल्या प्रादेशिक गरजा लक्षात घेऊन रोजगार निर्माण करणाऱ्या संशोधनावर भर द्यावा लागणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री  नितीन गडकरी यांनी केले. नागपूर शिक्षण मंडळ संचालित रेशीमबागस्थित श्री मथुरादास मोहता विज्ञान कॉलेजच्या अमृत महोत्सव सोहळयाचे कॅअ‍ॅळ करण्यात आले. यावेळी गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच संस्कृती व पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, संस्थेचे अध्यक्ष मोहित शाह, यांची उपस्थिती होती. 'दिल्लीत ऑटोमोबाईल इंडस्ट्रीचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले असे सांगून त्याठिकाणी कंपन्यांनी फ्लेक्स इंजिनच्या गाड्या मार्केटमध्ये आणल्या आहेत. शेतकऱ्यांनी तयार केलेल्या इथेनॉलवर या गाड्या धावणार आहेत. इथेनॉल आणि सीएनजीवर धावणाऱ्या स्कुटर देखील मार्केटमध्ये आल्या आहेत असे नमूद केले.  यावेळी त्यांनी नागपूरच्या विमानतळाबाबत माहिती देतांना सांगितल...

*आता आम्ही असं ठरवलं आहे की दोन वर्षामध्ये नागपूरचा इंटरनॅशनल एअरपोर्ट जेव्हा सुरू होईल, तेव्हा पहिलं विमान आम्ही तयार केलेल्या, शेतकऱ्याने तयार केलेल्या हवाई इंधनावर जाईल.*

गडकरी मोहता विज्ञान कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी अमृत महोत्सवी सोहळयाच्या निमित्ताने आठवणींना उजाळा दिला.

<u>सैफ अली खान -प्रकरण</u>

बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला प्रकरणी मुख्य संशयिताला मुंबई पोलिसांनी ठाण्यातून अटक केली असून त्याला न्यायालयानं ५ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. त्याचं नाव मोहम्मद शरीफ इस्लाम शहजाद असं असून तो मूळचा बांग्लादेशी असल्याचा संशय आहे. त्याने आधी आपलं नाव विजय दास असं सांगितलं होतं, पण पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर त्याचं खरं नाव समोर आलं.

<u>हवामान</u>

आज विदर्भात हवामान कोरडे राहणार असून सर्वात कमी तापमानाची नोंद नागपूर येथे 10 पूर्णांक 4 अंश सेल्सियस करण्यात आली आहे.

*****